## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०८ ची साक्ष

## निशाणी क्र. ६५

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – संतोष भाऊराव कोळी,

वय – ४७ वर्षे,

व्यवसाय – शेती,

राहणार – मालपुर, ता. शिंदखेडा, जि. धुळे,

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. डी. ई. माळी यांचे मार्फत.**

१. मी संतोष निंबा इंदवे यांस ओळखतो. मी राजश्री लक्ष्मण पानपाटील हिस देखील ओळखतो. घटना सन २०१६ मध्ये घडली होती. घटना किती वाजता घडली होती हे मला माहिती नाही. घटनेच्या दिवशी संतोष इंदवे व पानपाटील यांचे भांडण झाले होते. त्यांचे कश्यावरुन तरी भांडण होते. त्यांचे कश्यावरुन भांडण होते हे मला सांगता येणार नाही. पोलीसांनी माझा जबाब घेतला होता. त्यांच्यात भांडणा व्यतिरिक्त आणखी काही घडले नाही. आरोपी हा पत्रकार होता व फिर्यादी हे सरपंच होते. त्यांच्या वर्चस्वावरुन त्यांचेत भांडण झाले होते. आरोपी पत्रकार म्हणुन सरपंच पानपाटील यांना गावात काय काम चालु आहे याच्याबाबत प्रश्न विचारत होता. आमचे काम चालु आहे तरी तुम्ही प्रश्न विचारतात यावरुन त्यांचेत भांडण झाले होते.

**सरतपास पूर्ण.**

**मध्यांतर झाल्यामुळे साक्षीदाराचा उलटतपास तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2024.08.03 11:54:51 +0530

दिनांक : ०२/०८/२०२४ (आदित्य घ. नाईक)

स्थळ : दोंडाईचा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**<u>मध्यांतरानंतर शपथेवर उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन. पी. अयाचीत यांचे मार्फत.</u>**

२. प्रश्नः पोलीसांनी तुमचा जबाब तुमच्या सांगण्याप्रमाणे घेतला होता का ?

उत्तरः पोलीसांनी माझी केवळ आयत्या कागदावर सही घेतली होती.

आयत्या म्हणजे जे काही पोलीसांनी टाईप करुन आणले होते त्याच्यावर मी सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, राजश्रीबाई पानपाटील हया सरपंच असतांना माझी पत्नी संगिता कोळी हया ग्रामपंचायत सदस्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, संगितातार्इ यांची टर्म संपल्यानंतर मी ग्रामपंचायत सदस्य होतो. हे म्हणणे खरे आहे की, ग्रामपंचायत हिचे सदस्य पद हे आमच्या घरात पंधरा वर्षापासुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे राजश्रीताई व त्यांचे पती लक्ष्मण पानपाटील यांचेशी माझे चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस जबाबाच्या वेळेला मला लक्ष्मण भाऊंनी सांगितले होते की तुमचा जबाब लिहुन आलेला आहे त्यावर सही करुन दया.

३. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१६ मध्ये घटना घडल्याचे व आरोपी आणि फिर्यादी यांचेमध्ये कश्यावरुन तरी भांडण झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी पत्रकार म्हणुन प्रश्न विचारीत होते, काय काम चालु आहे याच्याबाबत प्रश्न विचारत होते व आमचे काम चालु आहे तरी तुम्ही प्रश्न विचारतात यावरुन त्यांचेत भांडण झाले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझा खोटा जबाब लिहुन घेतला व मी आज रोजी लक्ष्मण भाऊंच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2024.08.03 11:54:58 +0530

दिनांक : ०२/०८/२०२४ (आदित्य घ. नाईक)

स्थळ : दोंडाईचा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**प्रमाणपत्र**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – गणेश साईनाथ अहिरे, लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – ०३.०८.२०२४ |

स्वाक्षरित/–

लघुलेखक.